**नि.फौ.ख.क्र.३२/२०२५**
सरकार – वि.- सोनवणे
**निशाणी क्र.१२**

**सरकारतर्फे साक्षीदार क्र.१ यांची साक्ष शपथेवर सुरु**
मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नाव – शंकर बाळासाहेब माने
वय – २९ वर्षे, व्यवसाय – खाजगी नोकरी,
सध्या रा.- न्यु क्लासीक बिल्डींग,साई चौक, बालेवाडी, पुणे

**सरतपासणी सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती ए.एस.काळे यांचेमार्फत शपथेवर सुरु-**

घटना दि. २८ नोव्हेंबर २०२४ रोजी लोणावळा रेल्वे स्टेशनवर सकाळी ०४.३० वाजता घडली. मी दि. २७ नोव्हेंबर २०२४ रोजी रात्री १०.०० वाजताच्या महालक्ष्मी एक्सप्रेस या ट्रेनने एस-२ कोच सिट क्र. ८० असा मिरज ते ठाणे प्रवास करत होतो. माझ्या मोबाईलची बॅटरी संपल्यामुळे सकाळी उठुन मी माझा फोन चार्जिंगसाठी लावला. मी परत माझ्या डाव्या अंगावर झोपलो असता कोणीतरी माझा मोबाईल चार्जिंगवरुन काढुन चोरुन घेवुन गेला. माझ्या फोनला माझे इअर फोन कनेक्टेड होते. माझे इअर फोन देखील डिसकनेक्ट झाले. मी शोधाशोध केली, परंतु माझा मोबाईल मला दिसुन आला नाही. त्यावेळी ट्रेन लोणावळा स्टेशनवर थांबलेली होती. मी आजुबाजूस पाहिले, परंतु मला मोबाईल चोरलेला कोणी दिसुन आले नाही. त्यानंतर ठाणे स्टेशन येथे पोहचुन पोलीसांना तक्रार दिली. ती तक्रार दाखवल्यास मी ओळखु शकतो. आता मला सदरची तक्रार दाखवण्यात आली. त्यावर माझी स्वाक्षरी असुन त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि. क्र. १३** देण्यात येते.

२. मी तक्रार दिल्यानंतर प्रथम खबरी अहवाल नोंदवण्यात आला. सदरचा अहवाल मला आता दाखवण्यात आला. तो तोच असुन त्यावर माझी स्वाक्षरी आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि. क्र. १४** देण्यात येते.

३. मी तक्रार दिल्यानंतर तक्रारची प्रत मोबाईलच्या आय.एम.ई.आय क्रमांकासह शोधण्यासाठी सी.ई.आय.आर या पोर्टलवर नोंदवली. काही दिवसांनी मला पुणे पोलीस स्टेशनवरुन फोन आला व त्यांनी मला सांगितले की, माझा चोरीला गेलेला मोबाईल त्यांना मिळालेला आहे. त्यानंतर मी पुणे स्टेशनला आलो. त्यांना माझ्या मोबाईलचे कागदपत्रे देवुन न्यायालयामार्फत मोबाईल मिळवला.

**सरतपास पुर्ण.**

**<u>आरोपीतर्फे साक्षीदाराचा उलटतपास विधीज्ञ श्री.ए.टी.नावडकर यांच्यामार्फत सुरू-</u>**

४. हे म्हणणे खरे आहे की, माझा मोबाईल कोणी चोरला हे मला माहीत नाही. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी देखील मला चोर कोण आहे हे दाखवले नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझे मोबाईल सारखे बाजारात इतर मोबाईल देखील उपलब्ध आहेत.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

सा.वा.दा.ब.अ.क.के. समक्ष

**(एन.जे.चव्हाण)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
लोहमार्ग न्यायालय, पुणे.
दि.०२/०७/२०२५

Digitally signed by CHAVAN NIKHIL JEEVANRAO
Date: 2025.07.03 11:41:43 +0530

**(एन.जे.चव्हाण)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
लोहमार्ग न्यायालय, पुणे.
दि. ०२/०७/२०२५